लोकरंग
६ रविवार, १३ एप्रिल २००३

लक्षणीय पुस्तक

# अंधश्रद्धांकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी

भारत हा अनेकदृष्टीने वैधर्म्यांचा देश समजला जातो. बैलगाडीपासून जेट विमाने, मातीच्या झोपड्यांपासून गगनचुंबी आलिशान इमारती, वीज आणि पाणी दुर्मिळ असलेल्या खेड्यांपासून रात्रीचा दिवस करू शकणाऱ्या रोषणाईत, खाद्यपेयात पैसा पाण्यासारखा खर्च करणाऱ्या महानगरांपर्यंत मानवी जीवनाची दोन टोके आपण पाहतो, पचवतो आणि दृष्टिआड करतो. परंतु या सर्व वैधर्म्या इतकेच एक वेगळे वैधर्म्य देशात वाढत आहे. याची आपल्यापैकी बहुतेकांना जाणीवदेखील नसावी.

हे वैधर्म्य म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा यांच्यातले! स्वातंत्र्यपूर्व काळात 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' पुस्तक लिहिताना जवाहरलाल नेहरूंनी अशी आशा व्यक्त केली होती, की स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतीय जनता केवळ परंपरांचे अंधानुकरण न करता त्यातील युक्तिसंगत सार तेवढे घेईल आणि जीवनातले निर्णय घेताना वस्तुस्थितीची सप्रमाण दखल घेईल. परंतु आज स्वातंत्र्य मिळून पाच दशके उलटली तरी अंधश्रद्धांचा पगडा होता तसाच आहे- नव्हे वाढतच आहे. असे विदारक दृश्य आज दिसते आहे.


काळ्या ढगांना चंदेरी किनार आहे, ती अशा काही निवडक संघटनांची आणि व्यक्तींची ज्यांनी काळाची गरज ओळखून आपापल्या परीने अंधश्रद्धांविरूद्ध मोहिमा उघडल्या आहेत. अंधश्रद्धांमागची कारणे शोधून ती निराधार आहेत हे दाखवणे, तथाकथित चमत्कारांचे 'रहस्य' उलगडून दाखवणे, प्रत्यक्ष कृतीने आपले मत सिद्ध करणे आदी प्रकारांनी अंधश्रद्धांची जनमानसावरची पकड दूर करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा प्रयत्नांची चर्चा करणारी पुस्तकेपण बाहेर येत आहेत, ही जमेची गोष्ट आहे.

अशा पुस्तकांत प्रकाश घाटपांडे यांच्या 'ज्योतिष्याकडे जाण्यापूर्वी' या पुस्तकाचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो. मे २००१ मध्ये प्रथम प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाची दीड वर्षांत दुसरी आवृत्ती निघावी, ही एक आनंदाची गोष्ट आहे. कारण या पुस्तकात घाटपांडे यांनी भारतातील सर्वाधिक प्रसार झालेल्या अंधश्रद्धेवर प्रकाश टाकला आहे.

'फलज्योतिष ही एक अंधश्रद्धा आहे' हे समजावून सांगायला लागणे आणि तेही निरक्षरांना नव्हे तर डिग्री विभूषितांना, उच्चपदस्थांना, समाजधुरिणांनादेखील, इथेच खरी शोकांतिका आहे. अशा वेळी 'तुम्ही अंधश्रद्ध आहात, फसव्या विचारसरणीमागे धावून आपले हसे करून घेत आहात,' वगैरे आक्रमक प्रचार योग्य ठरत नाही. लहानपणी सूर्य आणि वाऱ्याच्या चढाओढीची गोष्ट वाचली होती, त्याचा इथे प्रत्यय येतो. वारा आणि सूर्य दोघांपैकी कोण एका पादचाऱ्याचा कोट त्याच्या अंगावरून काढून दाखवेल, अशी स्पर्धा होती. वारा वेगाने वाहू लागला, तसे पादचाऱ्याने कोट आवळून धरला. अखेर वाराच थकला. मग सूर्य पुढे आला. त्याने संथपणे प्रकाशणे चालू ठेवले आणि काही वेळाने पादचाऱ्याने फार उकडायला लागले, म्हणून कोट काढला.

आक्रमक प्रचाराने अंधश्रद्धेचा कोट आणखी आवळून धरला जातो. पण त्या व्यक्तीला सौम्य शब्दात पटवून दिले आणि त्याने स्वत: हौऊन तो कोट काढून फेकून दिला तर ते जास्त प्रभावी ठरणार नाही का? घाटपांडे यांचा मार्ग वाऱ्याचा नसून सूर्याचा आहे.

१०२ पानांच्या या छोटेखानी पुस्तकात लेखकाचे मनोगत वाचले, की त्याची ही शैली स्पष्ट होते. पुस्तकाच्या पहिल्या भागात ज्योतिषाबद्दल पुष्कळदा विचारले जाणारे प्रश्न आणि त्यांची उत्तरे दिली आहेत, तर दुसऱ्या भागात आधुनिक पार्श्वभूमीवर आधारित काही




माहितीपूर्ण लेख आहेत. लोक कुठल्या कारणांनी एखाद्या फलज्योतिष्याकडे जातात? त्यांना ज्या गरजा भासतात त्यांची पूर्ती करण्याचे सामर्थ्य या विषयात आहे का? फलज्योतिष्याकडे जाणाऱ्या 'जातका'ने ही प्रश्नोत्तरी वाचून मगच जावे का नाही हा निर्णय घ्यावा असे लेखकाचे आवाहन आहे. हे प्रश्न कुठल्या प्रकारचे आहेत याची कल्पना खालील काही नमुन्यांतून होईल.

१. फलज्योतिष म्हणजे काय?

२. जन्मरास/जन्म नक्षत्र म्हणजे काय?

३. अमावस्या अशुभ दिवस आहे काय? अमावस्येला/पौर्णिमेला वेडाचे/अपघाताचे प्रमाण जास्त का असते?

४. जुळ्या मुलांच्या कुंडल्यात फरक का असतो?

५. साडेसाती/ कालसर्प योग / ग्रहदशा म्हणजे काय?

६. ग्रहांचा मानवी जीवनावर परिणाम होतो, हे खरे आहे काय?

७. ग्रहांची शांती केल्याने फायदा होतो काय? ग्रहांचे खडे वापरून अनिष्ट टळते का?

८. विवाह जुळवण्याच्या वेळी पत्रिका बघावी का?

९. मंगळदोष म्हणजे काय?

१०. सिंहस्थात विवाह करू नये, असे का म्हणतात?

११. फलज्योतिष विज्ञान आहे का? अशा तऱ्हेच्या सुमारे ६० प्रश्नांची चर्चा आणि उत्तरे यात आहेत. भृगुसंहिता, वास्तुज्योतिष नाडी आदींचीही थोडक्यात माहिती दिली आहे. प्रत्यक्ष दावे काय असतात आणि वस्तुस्थिती काय असते, याची पुराव्यानिशी माहिती लेखकाने दिली आहे. वाचकाला त्यातून एक संदेश मात्र स्पष्ट शब्दात मिळतो. आजवर फलज्योतिषाला विज्ञान म्हणण्याजोगे त्यात काहीही आढळले नाही. मोघम भविष्यवाणीत भाकित करण्याची शक्ती नाही. भाकित म्हणजे स्पष्ट शब्दात अमुक वेळी, अमुक स्थळी, अमुक घडेल हे सांगू शकणे. हे प्रश्न व त्यांची उत्तरे वाचून प्रत्येकाने ठरवावे, की ज्योतिष्याकडे जावे का?

दुसऱ्या भागातील स्फुट लेखांत प्रथम फलज्योतिषाकडे वैज्ञानिक चिकित्सक दृष्टिकोनातून पाहिले आहे. त्यात फलज्योतिष्यांकडून वेळोवेळी केल्या जाणाऱ्या युक्तिवादांचे संयुक्तिक खंडन केले आहे. इथे लेखकाला आणखी पुष्कळ सांगता आले असते. उदाहरणार्थ, मोठ्या प्रमाणात नमुने गोळा करून, त्यांना संख्याशास्त्राचे निकष लावून भाकितांची तपासणी करण्यात आली आहे, पण ती मुख्यत्वेकरून पाश्चात्य देशात. अशा उदाहरणांत फलज्योतिषाला स्पष्ट भाकित करता येत नाही. (म्हणजे भाकित चुकीचे ठरते) हे सिद्ध झाले आहे. तसेच काही विशिष्ट प्रसंगी त्याची मानसिक परिस्थिती त्याला फलज्योतिषाकडे कशी आकर्षित करते, याची मानसशास्त्रज्ञांनी केलेली चिकित्सादेखील वाचनीय ठरली असती.

नाडी ज्योतिष, वास्तुशास्त्र, फेंग शुई वगैरेंवर वेगळ्या लेखात आणखी चर्चा आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने फलज्योतिषाचे अभ्यासक्रम चालवण्याचा निर्णय २००१ साली घेतला व त्यानंतर वादाचे वादळ निर्माण झाले. 'वेदिक ॲस्ट्रॉलॉजी' म्हणून या विषयाची केलेली भलावण वास्तविक निरर्थक आहे, हे विरोधकांनी दाखवून दिले. उलट ग्रीस - बॅबिलॉनकडून आलेले हे 'इंपोर्टेड' लोण आपण 'वेदातून निर्माण झालेले ज्ञान' म्हणून मिरवावे, या सारखी हास्यास्पद (की शोकास्पद?) गोष्ट कुठली असणार? या विषयावर काही ऐतिहासिक संदर्भ देऊन लेखकाला हा लेख आणखी रोचक करता आला असता.

वरील काही बाबतीत सुधारणेचा वाव असूनही हे पुस्तक वाचनीय आणि संग्रहणीय झाले आहे, यात शंका नाही. सर्वसामान्य वाचकांनी हे वाचून अंतर्मुख होण्याची गरज आहे. 'मानव हा बुद्धिसंगत विचार करणारा जीव आहे' हे वचन सार्थ करायला आपण सर्वांनीच आपल्या विविध अंधश्रद्धा चिकित्सक दृष्टिकोनातून पाहायला नकोत का?

**'ज्योतिष्याकडे जाण्यापूर्वी...' : प्रकाश घाटपांडे; प्रज्ञा सर्व्हिसेस, पुणे; मूल्य - ६० रु.**

■ जयंत नारळीकर